जनसंपर्क अधिकारी
मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट ३७२ - २३ दिनांक : - २४/१०/२०२३

# मुंबई-अहमदाबाद हायवेवर मोटारसायकलने जबरी चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक ८ गुन्हांची उकल - पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दि.१७/१०/२०२३ रोजी दुपारी ४.३० वा.च्या सुमारास फिर्यादी श्री. इम्रानहुसेन लियाकतहुसेन शेख, वय ३१ वर्षे, व्यवसाय - नोकरी, रा. पेल्हार नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर यांच्या हातातुन पेल्हार हॉटेलच्या समोरुन मुंबई-अहमदाबाद हायवे रोडने मुंबई बाजुकडुन लाल रंगाच्या पल्सर मोटार सायकलवरुन तिन इसमांनी भरधाव वेगात येऊन फिर्यादी यांच्या हातातील मोबाईल जबरीने खेचुन जबरी चोरी केलेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पेल्हार पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ९४०/२३ भा.द.वि.स कलम ३९२, ३४ अन्वये दिनांक १८/१०/२०२३ रोजी गुन्हा नोंद झाला आहे.

मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गवर पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत तसेच लगतच्या पोलीस ठाण्याचे हद्दतीत जबरीने मोबाईल चोरी करण्याचे प्रमाण वाढल्याने सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. वसंत लब्दे यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखचे अधिकारी अंमलदार यांना गुन्हा उघडकीस आणण्याच्या अनुषंघाने योग्य त्या सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंघाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि सोपान पाटील यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या अंमलदार यांचे ०४ पथके तयार करुन तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळाला भेट देऊन घटनास्थळावरील, मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील तसेच लगतचे ४० सीसीटीव्ही कॅमेरे चेक करुन त्याव्दारे आरोपीत यांचे फोटो व पल्सर १२५ मोटारसायकल क्रमांक प्राप्त करुन तसेच गुप्त बातमीद्वारा मार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे आरोपीत यांचा आरोपीत हे सोपारा फाटा येथुन मुंबई बाजुकडे जात असतांना त्यांचा पाठलाग करुन तुंगारेश्वर फाटा येथे आरोपीत नामे -१) सपनजी सुरेंद्र प्रसाद ऊर्फ जेडी, वय १८ वर्षे, रा. वालीव, ता. वसई जि. पालघर,२) शिवा शंकर सरोज, वय १९ वर्षे, रा. वालीव गाव, ता. वसई जि. पालघर व एक विधीसंघर्षग्रस्त बालक, यांना ताब्यात घेऊन त्यांच्या ताब्यात एकुण १३ मोबाईल फोन व गुन्हा करण्याकरीता वापरलेली पल्सर मोटारसाकल असा एकुण २,३१,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचे तपासात नमुद आरोपीत यांचेकडून खालील प्रमाणे गुन्हे उघडकिस आले आहेत.

१) **पेल्हार पो.स्टे गु.र.क्र. ९४०/२०२३ भादविस कलम ३९२,३४ प्रमाणे.**
२) **पेल्हार पो.स्टे गु.र.क्र. ९४१/२०२३ भादविस कलम ३९२,३४ प्रमाणे.**
३) **पेल्हार पो.स्टे गु.र.क्र. ९४८/२०२३ भादविस कलम ३९२,३४ प्रमाणे.**
४) **पेल्हार पो.स्टे गु.र.क्र. ९५०/२०२३ भादविस कलम ३९२,३४ प्रमाणे.**
५) **वालीव पो.स्टे गु.र.क्र. ८२१/२०२३ भादविस कलम ३९२,३४ प्रमाणे.**
६) **वालीव पो.स्टे गु.र.क्र. ८२३/२०२३ भादविस कलम ३९२,३४ प्रमाणे.**
७) **वालीव पो.स्टे गु.र.क्र. ८२४/२०२३ भादविस कलम ३९२,३४ प्रमाणे.**
८) **नायगाव पो.स्टे गु.र.क्र.३४५/२०२३ भादविस कलम ३९२,३४ प्रमाणे.**

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ- ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. वसंत लब्दे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. विजय पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. शिवानंद देवकर, पोलीस निरीक्षक (प्रशासन) पेल्हार पोलीस ठाणे, पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे, श्री. सोपान पाटील, सहा.पोलीस निरीक्षक, पो.हवा. योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, पो.अं.रवि वानखेडे, संजय मासाळ, निखील मंडलिक, किरण आव्हाड, राहुल कर्पे, दिलदार शेख, अनिल साबळे, सर्व नेम. पेल्हार पोलीस ठाणे पो.हवा. नामदेव ढोणे, पो.अं. सोहेल शेख, नेम. पोलीस उप आयुक्त कार्यालय परिमंडळ ०३, मिभाववि पोलीस आयुक्तालय यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

-----ooo-----